**<u>गोपनीय</u>**

क्रमांक : का.स./बैठक/२२१

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई - ४०० ०५१.**

दिनांक : १६ ऑक्टोबर, २००७.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ८ ऑक्टोबर, २००७ (सोमवार) रोजी झालेल्या २२१ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

१६.१०.२००७

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

| | |
|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर,<br>"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,<br>मुंबई - ४००.०१८. | - सदस्य |
| श्री.र.य.तांबे,<br>ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,<br>सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,<br>नागपूर - ४४० ०१५. | - सदस्य |
| श्री.हरिशंकरन्,<br>कार्यकारी संचालक - इन्फ्रास्ट्रक्चर,<br>इन्फ्रास्ट्रक्चर लिजिंग अँड फिनान्सिअल सर्व्हिसेस लिमिटेड,<br>वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),<br>मुंबई - ४०० ०५१. | - सदस्य |
| अपर मुख्य सचिव,<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - सदस्य |

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२३.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

**निमंत्रित** :

प्रधान सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २२१ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | ८ ऑक्टोबर, २००७ (सोमवार) |
| वेळ | : | दुपारी ३.०० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.जॉनी जोसेफ<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.रामानंद तिवारी<br>अपर मुख्य सचिव,<br>नगर विकास विभाग<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री.स्वाधीन क्षत्रीय<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन. | - | सदस्य |
| श्री.रत्नाकर गायकवाड<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

**निमंत्रित :**

डॉ.के.शिवाजी
सचिव (विशेष प्रकल्प) (अति.कार्यभार),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री.श्रीकांत सिंह
अतिरिक्त महापालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे),
बृहन्मुंबई महानगरपालिका
(महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे प्रतिनिधी म्हणून)

श्री.मिलिंद म्हैसकर
सह-महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

डॉ.बी.एन.पाटील
शास्त्रज्ञ-१,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन
(प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांचे प्रतिनिधी म्हणून)

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.ज.स.गिरासे
मुख्य लेखा अधिकारी व वित्त सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.डी.डी.भिडे
मुख्य अभियंता,
मिठी नदी कामे
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.सु.मो.रामचंदानी
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.प्र.ह.राऊत
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १३ सप्टेंबर, २००७ रोजी झालेल्या २२० व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १३ सप्टेंबर, २००७ रोजी झालेल्या २२० व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल**

सदर कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल कार्यकारी समितीच्या आगामी बैठकीत त्यावेळची प्रगती नमूद करुन सादर करण्यात यावा असे मा.अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी निदेश दिले

**बाब क्र.३ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत वांद्रे-कुर्ला संकुलातील वाकोला नाल्याचे रुंदीकरण, खोलीकरण व संरक्षक भिंत बांधणे तसेच मिठी नदीच्या काठावर संरक्षक भिंत व पटल भिंत बांधणे यासाठीच्या टप्पा-२ मधील कामाच्या लघुत्तम निविदांना (पुनःर्निविदांना) मान्यता मिळण्याबाबत.**

**३.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली वाढविणे तसेच मिठी नदी परिसराचा विकास करणे यासंबंधीच्या टप्पा-२ मधील कामांच्या सुमारे रु.५७०.७६ कोटी इतक्या अंदाजित खर्चास दिनांक २८ सप्टेंबर, २००६ रोजी झालेल्या ११७ व्या बैठकीत प्राधिकरणाने मान्यता दिली. त्यानुसार टप्पा-२ मधील ६ कामांसाठी प्राधिकरणाने निविदा मागविल्या होत्या. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, या कामांपैकी क्र. १, ३ व ४ च्या कामांच्या लघुत्तम निविदा स्विकारण्यास दिनांक १६ मार्च, २००७ रोजी झालेल्या २१९ व्या बैठकीत कार्यकारी समितीने मान्यता दिली. तसेच उर्वरीत क्र.२ चे काम म्हणजे वांद्रे-कुर्ला संकुलातील वाकोला नाल्याच्या (सा.क्र.६४५.० मी. ते २४३३.० मी.) मधील पात्राची रुंदी व खोली वाढविणे व वाकोला नाल्याच्या बाजूला (सा.क्र.६४५.० मी. ते २४३३.० मी.) प्रिस्ट्रेस्ड अँकर वापरुन डायफ्रॅम भिंत बांधण्याचे काम (अंदाजपत्रकीय रक्कम रु.४४२१.०० लाख), क्र.५ चे काम म्हणजे वांद्रे-कुर्ला

..४/-

संकुलामधील मिठी नदीच्या बाजूला लहान संगमापासून सी.एस.टी.पूलापर्यंत (सा.क्र.३३००.० मी. ते सा.क्र.५९३०.० मी.) व वाकोला नाल्याच्या बाजूला (सा.क्र.१६२५.० मी. ते २४३३.० मी.) संरक्षक भिंत बांधण्याचे काम (अंदाजपत्रकीय रक्कम रु.२४९६.०० लाख) व क्र.६ चे काम म्हणजे वांद्रे-कुर्ला संकुलामधील मिठी नदीच्या लहान संगमापासून सी.एस.टी. पूलापर्यंत मधील बाजूला (सा.क्र.३३००.० मी. ते सा.क्र.५९३०.० मी.) प्रिस्ट्रेस्ड अँकर वापरुन डायफ्रॅम भिंत बांधण्याचे काम (अंदाजपत्रकीय रक्कम रु.१७२५.०० लाख) या ३ कामांसाठी प्राप्त झालेल्या निविदा फारच जास्त दराच्या असल्यामुळे सदर निविदा नाकारुन फेरनिविदा मागविण्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली. सदर क्र.२, ५ व ६ येथील कामांचे सुधारीत अंदाजपत्रक मे.टीसीई कन्सल्टींग इंजिनिअर्स लिमिटेड या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराने तयार केले. तसेच बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, काम क्र.२ मधील वाकोला नाल्याच्या कामाचे स्वरुप दोन भागात विभागून त्याच्या एका भागात वाकोला नाल्याचे रुंदीकरण व खोलीकरण आणि दुस-या भागात संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे असे विभाजन करण्यात आले आहे. सुरुवातीच्या वाकोला नाल्याच्या पटल भिंतीच्या (Diaphragm wall) कामाचे स्वरुप बदलून आता संरक्षक भिंत बांधण्याचे ठरविले आहे. सुधारीत सर्वेक्षणानुसार साखळी क्रमांकात बदल झाला असून त्याप्रमाणे प्रस्तावित कामांत साखळी क्रमांक नमूद करण्यात आलेले आहेत. अशारितीने सुरुवातीच्या उर्वरीत ३ कामांऐवजी आता या कामांची संख्या चार झाली आहे. सदर कामांसाठी सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन फेरनिविदा मागविण्यात आल्या. एकूण ८० कोरे निविदा संच विकले गेले. तथापि, विहित कालावधीमध्ये एकुण ३२ पूर्ण केलेल्या निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त झालेल्या निविदांची छाननी केली असता क्र.II-१ येथील कामासाठी १२, क्र.II-२ येथील कामासाठी ८, क्र.II-३ येथील कामासाठी ७, क्र.II-४ येथील कामासाठी १, अशाप्रकारे एकूण २८ निविदा पात्र झाल्या. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, टप्पा-२ मधील काम क्र.II-१ येथील कामासाठी मे.राज इंजिनिअर्स यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १६.४०% कमी दराची निविदा लघुत्तम आहे, क्र.II-२ येथील कामासाठी मे.आर.पी.एस.इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ९.९९% कमी दराची निविदा लघुत्तम आहे तर क्र.II-३ येथील कामासाठी मे.आर.पी.एस.इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २.२२% कमी दराची निविदा

..५/-

लघुत्तम आहे. हे तीनही लघुत्तम देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारे, सुसंवादी व रास्त असल्यामुळे स्विकारण्यात यावेत अशी शिफारस प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.टीसीई कन्सल्टींग इंजिनिअर्स लिमिटेड यांनी केली आहे. त्यानुसार, हे तीनही लघुत्तम देकार स्विकारण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, क्र.II-१ येथील कामासाठी द्वितीय लघुत्तम निविदाकार मे.एन.ए.कन्स्ट्रक्शन यांनी प्रथम लघुत्तम निविदेसंबंधी काही हरकतीचे मुद्दे उपस्थित केले होते. तथापि, तांत्रिक निविदेच्या छाननीनंतर मे.एन.ए.कन्स्ट्रक्शन यांनी उपस्थित केलेल्या या हरकतीच्या मुद्यांची शहानिशा करण्यात आली. मे.एन.ए.कन्स्ट्रक्शन यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या मे.राज इंजिनिअर्स यांचेकडील कामासंबंधी मुख्य अभियंता (SWD), बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी मे.राज इंजिनिअर्स यांना पत्रान्वये कळविले आहे की सदर काम झोपडपट्टी हलविल्यानंतरच हाती घेण्यात येईल तसेच काम सुरु करण्याबाबत सूचना देईपर्यंत सदर काम बोली अर्हतेसाठी विचारात घेऊ नये. तसेच कार्यकारी अभियंता (SWD), बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी अजूनपर्यंत सदर काम सुरु न झाल्याचे देखील कळविले आहे. सदर बाबी विचारात घेऊन मे.राज इंजिनिअर्स यांची बोली अर्हता तपासली असता ते पात्र ठरतात. तसेच याबाबतीत सदर बाबी तपासून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.टीसीई कन्सल्टींग इंजिनिअर्स लिमिटेड यांनी मे.राज इंजिनिअर्स यांची सदर कामासाठी शिफारस केलेली आहे.

३.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, काम क्र.II-४ करीता केवळ एकच निविदा पात्र असून सदर निविदा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १८९% इतक्या जास्त दराची असल्याने अवाजवी आहे. सदर निविदाकाराने दिलेला देकार कमी करण्यासाठी त्यांना पत्राद्वारे विनंती करण्यात आली आहे. परंतु अद्याप त्यांच्याकडून अंतिम देकार प्राप्त झालेला नाही. या निविदाकाराने दिलेला अंतिम देकार वाजवी नसल्यास त्यांची निविदा नाकारुन फेरनिविदा मागविण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करावे अशी कार्यकारी समितीस विनंती करण्यात आली आहे.

**३.३** चर्चेदरम्यान श्री.भिडे, मुख्य अभियंता, मिठी नदी कामे यांनी असे स्पष्ट केले की, काम क्र.II-४ बाबत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.टीसीई कन्सल्टींग इंजिनिअर्स लिमिटेड यांचेमार्फत अभ्यास करुन जेथे शक्य असेल तेथे संरक्षक भिंत बांधण्यात येईल, मात्र जेथे शक्य नसेल तेथे डायफ्रॅम भिंत किंवा इतर पर्यायांच्या बांधकामाबाबत विचार करण्यात येईल जेणेकरुन पात्राच्या दोन्ही बाजूंवरील पक्क्या इमारतींना त्रास होणार नाही.

**३.४** त्यानंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१०६६</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत वांद्रे-कुर्ला संकुलातील वाकोला नाल्याचे रुंदीकरण, खोलीकरण व संरक्षक भिंत बांधणे तसेच मिठी नदीच्या काठावर संरक्षक भिंत व पटल भिंत बांधणे यासाठीच्या टप्पा-२ मधील कामांसाठी खालील तक्त्यानुसार क्र.II-१, II-२ व II-३ या कामांच्या लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे :-

| क्र. | कामाचे नांव | लघुत्तम निविदाकारांचे नांव | लघुत्तम निविदेची टक्केवारी व रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| II-१ | वांद्रे-कुर्ला संकुलातील वाकोला नाल्याच्या वाकोला पूल ते सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्यामधील (सा.क्र.६४५.० मी. ते २५२५.० मी.) पात्राची रुंदी व खोली वाढविण्याचे काम.<br>(अंदाजपत्रकीय रक्कम - रु.२२९४.०० लाख) | मे.राज इंजिनिअर्स | १६.४०% कमी दराने रु.१९१७.७८ लाख |

| क्र. | कामाचे नांव | लघुत्तम निविदाकारांचे नांव | लघुत्तम निविदेची टक्केवारी व रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| II-२ | वांद्रे-कुर्ला संकुलातील वाकोला नाल्याच्या वाकोला पूल ते सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्यामधील (सा.क्र.६४५.० मी. ते २५२५.० मी.) संरक्षक भिंत बांधण्याचे काम.<br>(अंदाजपत्रकीय रक्कम - रु.४२७०.०० लाख) | मे.आर.पी.एस.इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि. | ९.९९% कमी दराने रु.३८४३.४३ लाख |
| II-३ | वांद्रे-कुर्ला संकुलामधील मिठी नदीच्या बाजूला लहान संगमापासून सी.एस.टी. पूलापर्यंत (सा.क्र.३३००.० मी. ते सा.क्र.५८३३.० मी.) व लहान संगमापासून एल.बी.एस. मार्गाच्या बाजूला (सा.क्र.३३००.० मी. ते ४३५०.० मी.) संरक्षक भिंत बांधण्याचे काम<br>(अंदाजपत्रकीय रक्कम - रु.३४३०.०० लाख) | मे.आर.पी.एस.इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि. | २.२२% कमी दराने रु.३३५३.८५ लाख |

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** खालील क्र.II-४ च्या कामासाठी निविदाकाराने दिलेला अंतिम देकार वाजवी नसल्यास सदर निविदा नाकारुन फेरनिविदा मागविण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे :-

| क्र. | कामाचे नांव | लघुत्तम निविदाकारांचे नांव | लघुत्तम निविदेची टक्केवारी व रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| II-४ | वांद्रे-कुर्ला संकुलामधील मिठी नदीच्या एल.बी.एस. मार्गाच्या बाजूला सी.एस.टी. पूलापर्यंत (सा.क्र.४३५०.० मी. ते सा.क्र.५८८३.० मी.) प्रिस्ट्रेस्ड अँकर वापरुन डायफ्रॅम भिंत बांधण्याचे काम<br>(अंदाजपत्रकीय रक्कम - रु.१९६६.०० लाख) | मे.फेरो कॉंक्रीट कन्स्ट्रक्शन (इंडिया) प्रा.लि. | (+) १८९.०% अधिक दराने रु.५६८१.७४ लाख |

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

——— ००००००००००००० ———